Historicity Research Journal
Volume 2 | Issue 6 | Feb 2016

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

" वेरूळ लेणीतील लकुलीश मूर्तिशिल्प "

भेलोंडे जगदीश व्यंकटराव
इतिहास विभाग प्रमुख, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, कन्नड

सारांश :

वेरूळ येथे लकुलीशाचे मुर्तिशिल्प आढळणाज्या लेणी चालुक्य व राष्ट्रकुटांच्या काळामध्ये कोरण्यात आल्या आहेत. लेणी ही धर्म प्रसारकांसाठी कांही काळ थांबविण्यासाठी महत्वपूर्ण वास्तू होती. येथील वास्तवाच्या काळामध्ये धर्मातील तत्वज्ञानाचे मनन चिंतन करणे व देवतांची उपासना करण्यात येत असे त्यासाठी लेणीमध्ये देवतांची निर्मीती करण्यात आली. पाशुपतांच्या तत्वज्ञानानुसार शिवाची प्राप्ती ही योगाच्याद्वारे होते तेव्हा योगाद्वारे एकांतामध्ये शिवाची उपासना करता यावी यासाठी लेणी व मुर्तिशिल्पांची निर्मीती करण्यात आली. देवतांची उपासना करत असतांना देवतांचे मुर्तिशिल्प समोर ठेऊन उपासना करण्यात येत असत. चालुक्यांच्या शासन काळाच्या प्रारंभीच्या मुर्तिशिल्पांमध्ये वैष्णवांचे वर्चस्व होत परंतू नंतर शैव धर्माचा प्रभाव वाढलेला दिसतो. शिवाची लेणी, मंदिरे व शिवाशी संबंधित विविध मुर्तिशिल्पांची निर्मीतीही करण्यात आली. शैव संप्रदायास राष्ट्रकुट राज्यकर्त्यांचेही राजश्रय मिळालेला दिसतो. शैव संप्रदायाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झालेला असल्यामुळे तत्कालीन समाजावर शैव तत्वज्ञानाबरोबर पुराणकथांचा प्रभाव पडाला. भारतातील वेगवेगळ्या प्रदेशातील स्थानिक कारागीरांनी अशा पैराणिक कथांचा आधार घेऊन तशा प्रकारे मुर्ति शिल्पांची निर्मीती केली आणि लकुलीशाचे मुर्तिशिल्प हा त्याचाच एक भाग आहे.

प्रस्तावना :

औरंगाबाद (महाराष्ट्र) जिल्ह्यातील वेरूळ येथे डोंगरामध्ये लेणी स्थापत्याची निर्मीती करण्यात आली. या ठिकाणी असलेल्या एकूण ३४ लेणी पैकी लेणी क्र. १ ते १२ ह्या बौद्ध धर्मिय व लेणी क्र. १३ ते २९ या हिंदूधर्मीय तर लेणी क्र. ३० ते ३४ ह्या जैन धर्मिय लेणी आहेत. बदामी चालुक्य व राष्ट्रकुटांच्या काळामध्ये वेरुळ येथील लेणीची निर्मीती झालेली आहे. हिंदूधर्मीय लेणीची निर्मीती शिव या देवतांसाठी झालेली असल्याचे दिसते. हिंदू लेणींमधून शिव देवतांबरोबरच विष्णू व त्याच्या परिवार देवता आणि शक्ती देवतांचीही निर्मीती करण्यात आली आहे. पौराणिक कथांवर आधारित मूर्ति शिल्पांची निर्मीती करण्यात आली आहे. शिवाच्या विविध स्वरूपाचे मुर्तिशिल्प येथे पहावयास मिळतात. लकुलीश हा शिवाचाच एक अवतार असल्यामुळे लकुलीशाचेही मुर्तिशिल्प येथे आपणास पहावयास मिळते. लकुलीश मुर्तिशिल्पाविषयी व लकुलीशाने निर्माण केलेल्या पाशुपत संप्रदायाचा व विचारांचा प्रभाव तत्कालीन समाजावर व कारागिरांवर होता त्यामुळेच लकुलीश मुर्तिशिल्पाची निर्मीती झाली.

शिवाची उपासना लिंग व मुर्तिच्या स्वरूपामध्ये हडप्पा कालीन संस्कृतीमध्ये प्रचलीत होती. हडप्पापुर्व काळातही शिवाची उपासना लिंगाच्या स्वरूपामध्ये होत होती. आर्यपूर्व भारतीय संस्कृतीमध्ये पुजनिय असलेल्या शिवाचा उल्लेख आर्याच्या "ऋग्वेद" या ग्रंथात रूद्र असा आला आहे. यजुर्वेदामध्ये शिवास वनस्पती, मानव व पशुंचा महान देव म्हणून ओळखण्यात आले. तर अथर्ववेदामध्ये शिव शर्व, पशुपती, रूद्र, उग्र, भव, महादेव, एकव्रात्य या नावाने ओळखला जात असे.[१] चंद्रशेखर, कपर्दिन, शितीकंठ व विरूपाक्षा, त्रिलोचन, धूर्जटी, नीललोहित, व्योमकेश, त्र्यंबक, भीम, उग्र इ. अशी ४८ शिवाची नावे अमरकोशामध्ये आहेत.[२] गुप्तकालीन अभिलेखांमध्ये ईश, भूतपति, महाभैरव, ईश्वर, हर, जयदेव, कपालेश्वर, कोक मुखस्वामी, महेश्वर, पशुपती, पिनाकी, शंभु, शर्व, शिव, स्थागुण, शूलपाणि, शुरभोश्वर, त्रिपुरांतक, भवसृज, इ. नावाने शिवाचे वर्णन केले आहे.[३]

अनार्य संस्कृतीमये असलेल्या रूद्र या देवतेला वैदिक अर्यांनी आपल्या देवतांमध्ये स्थान दिले. शैवमतानुसार शिव हा सृष्टीचा निर्माता व संरक्षणकर्ता आहे. पण शिव हा स्मशानात राहणारा, अंगाला राख फासलेला, संहारकर्ता म्हणुन ओळखला जातो. उत्पत्ती, स्थिती व अस्त यापैकी सृष्टीची निर्मीती ब्रह्म, पालनाचे कार्य विष्णु तर संहार करण्याचे कार्य शिवाचे अशा प्रकारची कल्पना करण्यात येऊन वैदिकांच्या प्रमुख देवतांमध्ये प्रमुख तीन देवतामध्ये शिव ओळखला जाऊ लागला. वैदिक धर्मामध्ये असलेल्या बहुदेवतत्वांमुळे त्या त्या देवतांची उपासना करणारा वर्ग निर्माण झाला. वेगवेगळ्या देवदेवतांच्या उपासना पद्धती व त्यांचे नियमही वेगवेगळे निर्माण झाले. शिव, विष्णू व गणपती या देवतांची उपासना करणारा वर्ग हा शैव, वैष्णव व गाणपत्य या नावाने ओळखले जाऊ लागले. उपासना पद्धतीचे निर्माते व त्यांचे शिष्य यांचे तत्वज्ञानाचा पालन करणारा वर्ग हा त्या संप्रदायाचा म्हणून ओळखला जाऊ लागला. पाशुपत हा शैवमता अंतर्गत निर्माण झालेला एक संप्रदाय आहे.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

लकुलीश :

वायुपूराणाच्या २३ व्या अध्यायात भविष्य सांगातांना लकुलीश नावाचा शिवाचा २८ वा अवतार कायावरोहण किंवा कारोहण येथे होणार असल्याचे सांगितले आहे.[४] लकुलीशाच्या जन्म ठिकाणाविषयी वराहपुराणानेही हीच माहिती दिलेली आहे. पुराणांमध्ये घडलेल्या घटना खज्या झालेल्या आहेत हे दाखविण्यासाठी भविष्यवाणी सांगितलेली असत. उदयपूर (राजस्थान) येथील नाथ मंदिरामध्ये इ. स. ९७१ मधील एका अभिलेखामध्ये शिवाने लकुलधारीच्या रूपामध्ये भृगकच्छ येथे अवतार घेतला होता.[५] असे सांगितले आहे. शिवाचा अवतार म्हणून ओळखल्या गेलेल्या लकुलीशाच्या जन्माविषयी एक कथा सांगितली जाते. त्यानुसार ब्रह्मचारी शिवाने स्मशानात जाऊन एका अज्ञात व्यक्तिच्या मृतदेहोत प्रवेश करून नवा अवतार धारण केला. ह्या मृतदेहाच्या शेजारी त्याचे लकुल (लाकुड) पडले होते. शिवाने मृतदेहात प्रवेश करताच तो मृतदेह जिवंत झाला.[६] लकुलीशाच्या जन्माविषयीची अशाच प्रकारची एक कथा कारवां महात्मयमध्ये सांगितली आहे ती अशी, बडौदा जवळील उल्कापुरी गावामध्ये विश्वराज व त्याची पत्नी सुदर्शन या ब्राह्मण कुटूंबांमध्ये लकुलीशाचा जन्म झाला. बाल्यअवस्थेतच त्याने महत्पपूर्ण चमत्कार केले. सात महिने जिवंत राहिल्यानंतर त्याचा मृत्यू झाला. मृत अवस्थेतच कासावाद्वारे जलेश्वर लिंग येथे आणले गेले. जेथे त्यास नविन जीवन प्राप्त झाले. येथून त्याने कायारोहण येथे जाऊन शैव धर्माचा प्रसार केला.[७] एकदंर गुजरातप्रांत ही लकुलीशाची जन्मभुमी होती.

पाशुपतांचे तत्वज्ञान :

आगरवालांच्या मतानुसार इसवी सनाच्या पहिल्या शतकात किंवा त्याहीपूर्वी बुद्धीमान, ज्ञानी लकुलीशाने पाशुपत तत्व ज्ञानाची स्थापना केली.[८] डॉ. पी. एस. पाठक यांनी महाभारतातील शांतीपर्वामध्ये वर्णन केलेल्या ब्रह्माचा मुलगा भुतनाथ श्रीकण्ठ यांस पाशुपतांचा प्रवर्तक संबोधले असले [९] तरी लकुलीश हाच पाशुपत संप्रदायाचा निर्माता असल्याचे बहुसंख्य विद्वानांनी मान्य केले आहे. पाशुपतांचे तत्वज्ञान पंचार्थिका नावाने ओळखले जाते. यामध्ये कार्य, कारण, योग, विधी व दु:खान्त ही पाच मुख्य तत्वे सांगितले आहेत.[१०] कार्याद्वारे बंधनयुक्त आत्म्याची निर्मीती होऊ शकते व बंधनयुक्त आत्मा वेळेने प्रभावित असतो आणि परिवर्तनशिल आहे. शिव ही कारण असुन तो सृष्टीचा सृजनकर्ता व विनाशक आहे. कारण हे ज्ञान व कार्य शक्तीने पूर्ण आहे. शिवाच्या उपासनेने व्यक्तीगत आत्म्याचे शिवाशी योगाद्वारे एकरूप होणे. शरीरास भस्म लावणे, शैव नियमांचे पालन करणे यासारख्या विधीद्वारे नैतिक नियमांचे निर्माण होत असते. दु:खान्त हे शिवाच्या कृपेने जिवाच्या मुक्तीशी संबंधित आहे. पाशुपतांचे हे तत्वज्ञान द्वेतमताचा पुरस्कार करणारे आहे. यामध्ये आत्मा व शिव वेगवेगळे मानले असून आत्म्याच्या मुक्तीस महत्व दिलेले आहे. लकुलीशाने प्रतिपादन केलेल्या पाशुपत तत्वज्ञानाचा प्रसार त्याचे शिष्य कौशिक, गार्ग्य, मैत्रेय व कौरूष, ईशान, परगार्ग्य, कपिलांड, मनुष्यक, अत्री, पिंगल, पुष्पक, कौडिण्य इत्यादिंनी केला आहे.

लकुलीश मुर्तिशिल्प :

लकुलीशाचे मूर्तिशिल्प कशा प्रकारे तयार करावे त्याची आयुधे कोणती व त्याचे आसन या सर्व बाबींची माहिती वेगवेगळ्या पुराणांमध्ये दिलेली आहे. वायुपुराणानुसार त्याच्या हातात लगुड - लकुट म्हणजे सोटा असला पाहीजे. विश्वकर्मावतार शास्त्राप्रमाणे तो पद्मासानात पाहिजे. एका हातात महाळूंग आणि दूसज्या हातात दंडा / सोटा धरलेला आणि त्याचे लिंग उद्दिपित असले पाहिजे. [११] एशियाटिक मायथॉलॉजीमध्ये एक शिवाचे वर्णन आले आहे. त्यांत डाव्या पायाची मांडी घातली असून उजवा पाय गुडघ्यात मोडून तळपायावर उभा केलेला आहे. त्याने उजवा हात उजव्या गुडघ्यावर ठेवला असुन डाव्या हातात एक अखुट सोटा घेतला आहे. सर्वत्र आढळणाज्या लकुलीशाचे मुर्तिशिल्पामध्ये लकुड हे त्याचे वैशिष्ट्य आवर्जुन दिसते पण काही ठिकाणी ते उजव्या हातात तर काही ठिकाणी डाव्या हातात दाखवलेले आहे.

लेणी क्र. १६

राष्ट्रकुटांच्या काळात निर्माण झालेल्या कैलाश लेणीमध्ये लकुलीशाचे मुर्तिशिल्प कोरलेले आहे. कैलाश मंदिराच्या दक्षिण दिशेच्या बाह्य भिंतीवर दक्षिणाभिमुख लकुलीशाचे हे मुर्तिशिल्प आहे. लकुलीशाचे हे मुर्तिशिल्प चर्तुभूज असुन स्थानक स्थितीत आहे. लकुलीशाच्या एका उजव्या हातात लकुड आहे तर डाव्या हातात सर्प असून दुसरा हात कमरेवर ठेवलेला आहे. त्याच्या मस्तकी जटाभार असून उर्ध्वलिंग असावे सध्या भग्न स्थितीत आहे.

लेणी क्र. २१

लेणी क्र. २१ ही रामेश्वर लेणी या नावाने ओळखली जाते. या लेणीची निर्मीती राष्ट्रकुटांच्या पुर्वीची आहे. या लेणीच्या प्रवेशद्वारावरच्या चौकटीवरच लकुलीशाचे मुर्तिशिल्प आहे. या ठिकाणी लकुलीशाला दोन हात असुन तो वज्रपद्मासनात बसलेला आहे. त्याच्या उजव्या हातात लाकुड आहे. तर डावा हात गुडघ्यात मोडलेल्या डाव्या पायावर ठेवलेला आहे.

लेणी क्र. २९

लेणी क्र. २९ ची निर्मीती कैलाश लेणीच्या पूर्वी झालेली असावी. कारण या लेणीतील स्तंभ हे चालुक्य शैलीचे असल्याचे दिसतात त्याचबारोबर चालुक्य शैलीचे अनेक वैशिष्ट्ये याठिकाणी पाहवयास मिळतात. धुमार लेणी किंवा सिता नहानी म्हणून ओळखल्या जाणाज्या लेणीमध्ये लकुलीशाचे आसनस्थ मुर्तिशिल्प आहे. लुकलीशाच्या खालच्या बाजूस सहा नागपुरूष दाखवलेले आहेत. लकुलीशाची मुर्ति ज्या कमलासनावर आसनस्थ दाखवलेली आहे. त्या कमळाचा भार जणु हे सहा नागपुरूष पेलत आहेत असे दिसते. लकुलीशाची ही मुर्ति द्विभुज आहे. त्याच्या डाव्या हातात लाकुड आहे तर उजवा हात वरमुद्रेत असावा.

संदर्भ :

१. आनंद सिंह - प्राचीन भारतीय धर्म - हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय - प्रथम संस्करण - एप्रिल २०१०
पृ. २०५

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

२. देगुलरकर गो. बं. - शिवमुर्तये नम : - स्नेहल प्रकाशान पुणे - २०१४ पृ. २२
३. डॉ. अहिरवार राजकुमार - भारतीय कला विविध आयाम - आर बी एस ए पब्लिशर्स, जयपुर प्रथम संस्करण २०१२ पृ. १४४
४. डॉ. खरे ग. ह. - मुर्तिविज्ञान - भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे - प्रथमावृत्ती १९३९ पुर्नमुद्रण २०१२ पृ. १२८
५. डॉ. गुप्त परमेश्वरीलाल - गुप्त साम्राज्य - विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी - प्रथम संस्करण १९६० पृ. ४९८
६. श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री - मराठी विश्वकोश खंड - ९ महाराष्ट्र राज्य साहित्स संस्कृती मंडळ, मुंबई - प्रथम संस्करण १९८० पृ. ६३५
७. आनंद सिंह - प्राचीन भारतीय धर्म - हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय - प्रथम संस्करण - एप्रिल २०१० पृ. २१२
८. देगुलरकर गो. बं. - शिवमुर्तये नम : - स्नेहल प्रकाशान पुणे - २०१४ पृ. २२
९. डॉ. अहिरवार राजकुमार - भारतीय कला विविध आयाम - आर बी एस ए पब्लिशर्स, जयपुर प्रथम संस्करण २०१२ पृ. १४६
१०. आनंद सिंह - प्राचीन भारतीय धर्म - हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय दिल्ली विश्वविद्यालय - प्रथम संस्करण - एप्रिल २०१० पृ. २१२
११. देगुलरकर गो. बं. - शिवमुर्तये नम : - स्नेहल प्रकाशान पुणे - २०१४ पृ. २२